ZEE मराठी दिशा
शनिवार २१ - २७ एप्रिल २०१८





ॲड. नयना परदेशी
zeemarathidisha@dnaindia.net




# कायद्याचा धाक का नाहीये?

'सुनो द्रौपदी शस्त्र उठालो अब गोविंद ना आयेंगे...' कठुआ आणि उन्नाव येथील लहान मुलींवरील बलात्काराने संपूर्ण देश ढवळला असतानाच व्हॉट्सॲपवर ही कविता आली आणि मनात विचार आला, खरोखर द्रौपदीने शस्त्र हातात धरून प्रश्न सुटणार आहे का?

**कठुआ आणि उन्नाव येथील लहान मुलींवरील बलात्काराने देशभर उद्विग्नता निर्माण झाली आहे. अशी अमानुष कृत्ये कोणी करू धजणार नाही, असा धाक निर्माण करण्यात आपला कायदा कमी का पडतो?**

'न्यायाला उशीर म्हणजेच न्यायाला नकार' (Justice delayed is justice denied) हे आपण सर्वच जाणतो आणि लवकरात लवकर, सुयोग्य न्याय हे कुठल्याही न्यायप्रणालीचे मूलभूत तत्त्व आहे. पण दुर्दैवाने आपल्या देशात 'तारीख पें तारीख' हीच परिस्थिती आहे. त्यामुळेच बलात्काराच्या दाव्यांसाठी जलदगती न्यायालये आपल्याकडे निर्माण झाली आहेत. पण 'जलद' हा शब्द सापेक्ष आहे. शिवाय, दावे जलदगती न्यायालयांकडे गेले तरी बाकीची न्यायप्रणाली, नियम, पद्धती या बाबी ठरलेल्या असतात आणि ते राबवणारी माणसेही सारवलेल्या मनोवृतीची असतात. त्यामुळे तिथेही प्रकरणे प्रलंबित राहतात. अर्थातच इतर न्यायालयांच्या तुलनेत जलदगती न्यायालयात लवकर निर्णय लागतात, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्यामुळे जलदगती न्यायालयांची अधिक संख्येने निर्मिती, त्यांना लागणाऱ्या सोयी-सुविधांचा पुरवठा, याचबरोबर त्वरित न्याय मिळण्याच्या दृष्टीने काही बदल कायद्यातही अपेक्षित आहेत.

बलात्काराची कोणतीही घटना घडल्यानंतर पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरते. बलात्काराच्या बऱ्याच प्रकरणांत पोलिस 'प्रथम खबरी अहवाल' (FIR) नोंदवण्यास टाळाटाळ करतात. अशा घटनेत पीडित व्यक्तीची त्वरित वैद्यकीय चाचणी करणे व मदत देणे आवश्यक असते. पण बऱ्याच वेळा पोलिस पीडितेची वैद्यकीय तपासणी वेळेत करत नाहीत. त्यामुळे पुरावा नष्ट होण्याची भीती निर्माण होते. सर्वोच्च न्यायालयाच्या 'मथुरा' केसमधील निर्देशांनुसार पीडितेला पोलिसठाण्यातच मोफत कायदेशीर सल्ला व मदत मिळणे आवश्यक आहे. पण हे कधीच घडत नाही. पीडितेला तत्काळ वैद्यकीय मदत, समुपदेशन, मोफत कायदेशीर सल्ला आणि नुकसान भरपाई यातील बऱ्याच गोष्टी दुरापास्त असतात.

उन्नाव आणि कठुआ येथील दोन्ही घटना 'पोक्सो' कायद्याखाली (बाल लैंगिक शोषणविरोधी कायदा) येतात, कारण पीडित मुली १८ वर्षांखालील वयाच्या आहेत. बलात्काराची घटना जर अल्पवयीन व्यक्तीच्या बाबतीत घडली असेल तर 'पोक्सो' कायद्यांतर्गत तरतुदींनुसार FIRची प्रत बालकल्याण समितीसमोर सादर करणे, ज्यामुळे बाल कल्याण समिती बालकाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते आदेश देऊ शकेल, तिचा जबाब नोंदवताना पोलिसांनी साध्या कपड्यात जाणे, पीडित व्यक्तीला जिच्या सान्निध्यात सुरक्षित वाटते अशा व्यक्तीच्या उपस्थितीत तिचा जबाब स्त्री पोलिस अधिकाऱ्याने नोंदवणे, जबाब दंडाधिकाऱ्यांसामोर नोंदवणे, ज्यामुळे पीडितेला वारंवार त्या घटनेचे वर्णन सांगावे लागणार नाही- अशा अनेक बाबींचा समावेश आहे. पण बहुतांश पोलिसांना या विशेष कायद्यांचे, त्यातील तरतुदींचे प्रशिक्षणच मिळालेले नसते. त्यामुळे त्यांच्यामध्ये अपेक्षित संवेदनशीलता आढळत नाही. याबरोबरच भ्रष्टाचार, विविध प्रकारचे दबाव याच्यामुळेही पोलिसांकडून तपासात अनेक त्रुटी ठेवल्या जातात वा राहून जातात. दुर्दैवाने, त्याचा फायदा आरोपींना मिळतो.

साक्षीदारांची सुरक्षितता हाही महत्त्वाचा मुद्दा! साक्षीदार उलटतात आणि केस कमकुवत होते. उन्नाव प्रकरणात पीडित मुलीच्या वडिलांना झालेली बेदम मारहाण आणि त्यात झालेला त्यांचा मृत्यू हे पोलिसांची निष्क्रियता, त्यांच्यावर असणारा प्रचंड राजकीय दबाव याचे निर्देशक आहे. अनेक पोलिसठाण्यांत स्त्री पोलिस अधिकाऱ्यांची उपलब्धता नसणे व त्यामुळे पीडितेचा जबाब पुरुष अधिकाऱ्याने नोंदवणे, हे पोक्सो कायद्याच्या तरतुदींच्या विरोधात ठरते.

कित्येक वेळा पीडित स्त्रीला वारंवार साक्षीसाठी पोलिसठाण्यात बोलावून दिवसभर बसवून ठेवले जाते. ती जर सज्ञान असेल तर 'तुझ्याशी कोण लग्न करणार, त्यापेक्षा केस मागे घे', इथपासून ते 'बलात्कार करणाऱ्याशीच लग्न कर' इथपर्यंत काहीही सल्ले दिले जातात. पोलिसांची संवेदनशीलता वाढवणे, हे प्रकर्षाने व्हायला हवे.

बलात्काराच्या दाव्यामध्ये वैद्यकीय तपासणी व त्याचा अहवाल हा अत्यंत आवश्यक असा साक्षीपुरावा असतो. पण बऱ्याच वेळा डॉक्टरांना याचे ज्ञान नसते. यासाठी 'सेहत' या संस्थेने खास 'सेफ किट' विकसित केले. त्याची विश्वासार्हता पटल्याने मुंबई महापालिकेतील बहुतेक सर्व इस्पितळांत वापरले जाते. 'सेफ किट' हे पीडित महिलेच्या संपूर्ण आरोग्यासाठी उपयुक्त आहे. राज्यातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, पुराव्याच्या दृष्टीने योग्य तपासणी अहवाल बनवण्याचे प्रशिक्षण, पीडितेला योग्य मदत देण्याचे शिक्षण व समुपदेशन यांचीही खूपच गरज आहे.

आपल्या देशात आरोपींसकट सर्वांना अधिकार आहेत. पण दुर्दैवाने पीडित व्यक्तीला न्याय मिळवण्याचे अधिकार फारच मर्यादित आहेत. सर्व फौजदारी गुन्ह्यांत (ज्यात बलात्काराच्या गुन्ह्यांचाही समावेश आहे) दावा सरकारी वकिलाकडून दाखल होतो आणि पीडित व्यक्ती साक्षीदार बनते. तिला स्वतःच्या मदतीसाठी वकील नेमता येत असला तरी तिची वकील फक्त सरकारी वकिलांना मदत करणे व एकंदर केसवर नजर ठेवणे इतकेच काम करू शकते. परिणामी, पीडित स्त्रीचा अशा दाव्यावर काहीच ताबा राहत नाही. सरकारी वकिलाची त्या दाव्यात फारशी सामिलकी असतेच असे नाही. अनेक वेळा सरकारी वकिलांकडून पीडितेची बाजू हिरिरीने मांडली जात नाही आणि आरोपी निर्दोष सुटतो. (सरकारी वकिलांना त्यांच्या कामाचे पैसे सरकारकडून मिळत नसल्याने त्यांनी कोर्टात दावा दाखल केल्याची अलिकडची बातमी पुरेशी बोलकी आहे.) त्यामुळे पीडित व्यक्तीला काही कायदेशीर अधिकार मिळण्याची, केवळ साक्षीदार न राहता स्वतःच्या वकिलातर्फे बाजू मांडण्याची, युक्तिवाद करण्याची संधी मिळण्यासाठी कायद्यात बदल करणे गरजेचे आहे.

निर्भया, शक्ती मिल कंपाउंड, कठुआ, उन्नाव, सुरत आणि अशा अनेक घटनांची मालिका थांबवायची असेल तर कायद्यातील तरतुदी, पोलिसांची व समाजाची मानसिकता बदलण्याची आणि आरोपींना लवकरात लवकर योग्य शिक्षा करून कायद्याचा धाक निर्माण करण्याची गरज आहे.

(लेखिका कायदेतज्ज्ञ आहेत)